| MHOS020004772026 | दिवाणी किरकोळ अर्ज नं.२४३/२०२६<br>अमजद व इतर विरुध्द निरंक |
|---|---|

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश

१. अर्जदार क्र.१ ते ५ यांनी मुंबई रेग्युलेशन (विनिमय) कायद्यातील कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांच्या म्हणण्यानुसार अर्जदार क्र.१ ते ५ हे **नजीरा मैनोद्दीन तांबोळी यांचे** अपत्ये आहेत. तसेच, **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांचे पती नामे मैनोद्दीन कासीम तांबोळी तथा अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील नामे मैनोद्दीन कासीम तांबोळी हे दि.२६.०७.२०२० रोजी मयत झाल्याचे कथन केले आहे. तसेच, **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** हे **दिनांक २४.०९.२०२३** रोजी मयत झालेले आहेत. तसेच, **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार क्र.१ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारस आहेत. **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांनी वारसा दाखला मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तसेच वारस दाखला प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली आहे.

३. माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ते ५ हे विनंती केल्याप्रमाणे वारस दाखला प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे काय ? | होय... |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारण मिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

४. अर्जदार यांचे विधीज्ञ श्री.व्ही.डी.मोरे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील म्हणण्याच्या पृष्टयर्थ **अर्जदार क्र.१ अमजद मैनोद्दीन तांबोळी** यांचे **पुराव्याचे शपथपत्र नि. क्र.१०** वर सादर केले असुन, त्यामध्ये अर्जदार क्र.१ यांनी शपथेवर अर्जातील नमुद मजकुर कथन केलेला आहे. या व्यतिरिक्त अर्जदार यांनी **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांचा **मृत्यु दाखला नि. क्र.४/१** दाखल केला आहे. तसेच, तसेच, स्वयं घोषित वारस प्रमाणपत्र, अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या आधारकार्डची छायांकीत प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच, **दिनांक १३.०३.२०२६ रोजीच्या दैनिक संघर्ष** या वृत्तपत्राची जाहिर नोटीस **नि. क्र.०९** वर दाखल केलेली आहे. तसेच अर्जदाराने **नि. क्र.१६** वर पुरावा बंद करण्याची पुरसीस दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांच्या नात्याबाबत कोणताही वाद नाही. सदर प्रकरणामध्ये जाहिर नोटिसीच्या अनुषंगाने कोणीही सदर प्रकरणामध्ये हजर होवुन हरकत नोंदविलेली नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचे व पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, **नजीरा मैनोद्दीन तांबोळी यांचा मृत्यु दिनांक २४.०९.२०२३** रोजी झालेला आहे. तर, प्रस्तुत अर्जदार क्र. १ ते ५ हे **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

५. अर्जदाराने मुंबई रेग्युलेशन कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सायटेशन दिनांक ०१.०४.२०२६ रोजी धाराशिव येथील दिवाणी न्यायालय, व.स्तर, धाराशिव, तहसिल कार्यालय, धाराशिव तसेच, नगरपरिषद कार्यालय, धाराशिव, ता.जि. धाराशिव येथे डकवुन बजावणी केलेली आहे. सदर अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, मी या निष्कर्षाप्रत आलेलो आहे की, प्रस्तुत अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. वारस प्रमाणपत्र हे फक्त वारस आहे असे ठरवते. ते मयताच्या मिळकतीमध्ये हक्क, अधिकार प्रस्थापित करीत नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. आवश्यक ती कोर्ट फी भरल्यानंतर मुंबई रेग्युलेशन (विनीमय) कायद्यातील तरतुदीनुसार, अर्जदार क्र.१ ते ५ हे **नजीरा मैनोद्दीन तांबोळी** यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला देण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे देण्यात आलेले प्रमाणपत्र हे कोणत्याही सरकारी किंवा बिनसरकारी संस्थेकडुन रक्कम प्राप्ती करीता लागु ठरणार नाही.

KASHINATH TIPPANNA SURWASE
Digitally signed by KASHINATH TIPPANNA SURWASE
Date: 2026.05.08 15:28:38 +0530

**दिनांक** : ०८.०५.२०२६. **( के. टी. सुरवसे )**

**ठिकाण : धाराशिव** ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

धाराशिव.